# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी : २२०२६२४९, २२८३५२४७, २२८२८९९६, २२०२५३५४.(थेट)
फॅक्स : २२८२१२६९.
ई-मेल पत्ता : headquarters@mjp.gov.in
वेब पत्ता : www.mjp.maharashtra.gov.in

## **** परिपत्रक क्र. १७९ ****

**विषय:** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा अंतर्गत कंत्राटदारांच्या नोंदणी नियमांमध्ये सुधारणा करणे बाबत.

**संदर्भ:** १) मजीप्राचे परिपत्रक क्र.१७०, दिनांक २१ नोव्हेंबर, २०१५.
२) मजीप्राचे परिपत्रक क्र.१७२, दिनांक ०६ जानेवारी, २०१६
३) मा. संचालक मंडळाच्या दिनांक १५ फेब्रुवारी,२०१६ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

प्राधिकरणाकडील कंत्राटदाराच्या नोंदणीकरीता वेळो वेळी आदेश निर्गमीत करण्यांत आलेले आहेत. संदर्भिय परिपत्रक क्र.१ अन्वये कंत्राटदाराने नोंदणी करिता अर्ज सादर करताना पाणी पुरवठा किंवा मलनि:सारण योजनेशी निगडीत कामे पार पाडलेली आवश्यक असलेबाबतचे निर्देश निर्गमित करण्यात आले आहेत. तथापि, सदरचे निर्देश निर्गमित करीत असताना कोणकोणत्या प्रकारची कामे पाणी पुरवठा व मलनि:सारण योजनेशी निगडीत आहेत याबाबतचा उल्लेख केलेला नाही. नोंदणीकरीता कंत्राटदारांमार्फत विचारात घ्यावयाची कामे ही कंत्राटदारामार्फत प्रामुख्याने पाणी पुरवठा किंवा मलनि:सारण या दोन योजनांशी संबंधित प्रत्यक्षातील बांधकामांच्या अनुभवासंदर्भात असणे अपेक्षित आहेत. तथापि, ज्या कंत्राटदारामार्फत पाणी पुरवठा योजनांची दैनंदिन देखभाल दुरुस्तीची कामे पार पाडलेली आहेत, ती गृहित धरण्याबाबत मागणी त्यांच्या मार्फत नोंदणी देण्याच्या वेळेस करण्यात येत आहे. तसेच काही प्रकरणांमध्ये केवळ सुधारणा कामाच्या अनुभवाचा अनुषंगाने नोंदणीची मागणी केली जाते. त्यामुळे या संदर्भात अधिकचे स्पष्टीकरण करणे अत्यावश्यक झाले आहे.

तसेच यापूर्वी कंत्राटदारांमार्फत सादर केलेल्या मुळ नोंदणी अर्जाची वैधता ही त्यांनी नोंदणी फी भरलेल्या दिनांकापासून एक वर्ष इतकी होती. तथापि, काही कंत्राटदारांमार्फत अपूर्ण माहितीसह/कागदपत्रासह प्रस्ताव प्राधिकरणाकडे प्राप्त होतात. अशा प्रस्तावांची पडताळणी करुन प्राधिकरणाकडून त्या प्रस्तावातील त्रुटिंची पूर्तता कंत्राटदारास कळवून देखिल सुमारे एक वर्षापेक्षा जास्तीचा कालावधी उलटून देखिल काही कंत्राटदारांमार्फत त्यांची पूर्तता करण्यात येत नाही, किंवा पूर्तता करण्यास सुमारे चार ते पाच महिन्यांचा कालावधी घेण्यात येतो. त्यामुळे संबंधित कंत्राटदारांचे नोदणीचे प्रस्ताव प्राधिकरणाकडे दिर्घकाळ प्रलंबित राहतात. प्राधिकरणाकडे प्राप्त होणारे कंत्राटदार नोंदणीचे प्रस्ताव सादर करताना कंत्राटदाराने परिपूर्ण सादर करणे तसेच सदर प्रस्तावावर वेळेत व त्वरीत कार्यवाही होणेच्या दृष्टीने प्राधिकरणाच्या नोंदणी नियमावलीमध्ये खालीलप्रमाणे काही सुधारणा संदर्भिय पत्र क्र. ३ च्या अनुषंगाने करण्यात येत आहेत.

१. **कंत्राटदार नोंदणीसाठी विचारात घ्यावयाच्या कामांच्या अनुभवाबाबत..**

कंत्राटदार नोंदणी देताना पाणी पुरवठा किंवा मलनि:सारण योजनेशी निगडित काम पार पाडलेली असली पाहिजे असे परिपत्रक क्र.१७०, दि.२१.११.२०१५ अन्वये सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये आता पुढील प्रमाणे अधिक स्पष्टता आणण्यात येत आहे. कंत्राटदाराच्या कामांच्या अनुभवाचा विचार करताना कामाची व्याप्ती केवळ देखभाल-दुरुस्ती, सुधारणा कामांचा एवढाच असेल तर अशा देखभाल-दुरुस्ती कामांचा, सुधारणा कामांचा विचार पाणी पुरवठा व मलनि:सारण अनुभवासाठी गृहीत धरण्यात येऊ नये.

तसेच देखभाल-दुरुस्तीच्या कामामध्ये, सुधारणा कामांमध्ये जर भांडवली स्वरुपाच्या कामांचा समावेश असेल तर केवळ अशा भांडवली कामांपुरता अनुभव विचारात घेण्यात येईल.

२. **कंत्राटदार नोंदणी पध्दत सुटसुटीत व वेगवान करण्याच्या दृष्टीने नोंदणी नियामवली** मुद्दा १.०१, व १.०१(**xix**) **मध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.**

नोंदणी नियमावली मधील मुद्दा १.०१ नुसार कंत्राटदाराने परिशिष्ट-अ मधील विहित नमुन्यात अर्ज सादर करणे आवश्यक आहे. तथापि प्रस्तावातील पडताळणी सुलभ होण्याच्या दृष्टीने सदर विहित नमुन्यातील अर्जासोबत संदर्भिय परिपत्रक क्र.१७२ दि.०६.०१.२०१६ सोबत निर्गमित केलेल्या तपासणी सुची (परिशिष्ट-अ) सादर करणे आवश्यक आहे.

तसेच नोंदणी नियमावली मधील मुद्दा १.०१ (**xix**) नुसार मुळ नोंदणी अर्जाची वैधता ही जरी एक वर्षाची असली तरी त्रुटींच्या पुर्तते अभावी नोंदणीचे प्रस्ताव प्राधिकरणाकडे दिर्घ काळ प्रलंबित राहतात. त्यामुळे सदर अर्जाची वैधता कालावधी जरी एक वर्ष असला तरी ठेकेदारामार्फत पूर्तता होणे अपेक्षित असलेले मुद्दे ठेकेदाराला कळविल्यानंतर एक महिन्याच्या आत त्याने त्या मुद्यांची पूर्तता करणे बंधनकारक राहील. अन्यथा त्रुटींची पुर्तता विहीत कालावधीत न केलेल्या कंत्राटदारांचे नोंदणी अर्ज दफ्तरदाखल करण्यात येतील.

उपरोक्त सुधारणा व्यतिरिक्त ठेकेदार नोंदणीबाबत इतर प्रचलित नियम या पुढेही लागु राहातील. उपरोक्त सुचनांचे सर्व क्षेत्रिय कार्यालयांनी काटेकोर पालन करणे बंधनकारक आहे.

**(संतोष कुमार)**
**सदस्य सचिव**

**जा.क्र.मजीप्रा/सस/भांडार शाखा/नोंदणी/२५२, दिनांक:३०.०३.२०१६**
**माहितीसाठी व कार्यवाहीसाठी:**

प्रत: संचालक (तांत्रिक), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
प्रत: संचालक (वित्त), मजीप्रा, सिडको भवन, नवी मुंबई.
प्रत: मुख्य अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ______________.
प्रत: अधीक्षक अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ______________.
प्रत: मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
प्रत: कार्यकारी अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ______________.